सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
राष्ट्रीय छात्र सेना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

लेफ्ट. आशिष सांगळे
संपर्क : +९१७०२८९९११८१
: ०२०-२५६२२६८३

संदर्भ क्र. विविमं/२०२४-२५/१२८५ दि.३०/०५/२०२५

**प्रति,**

**मा. प्राचार्य / मा. संचालक,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित **फक्त नाशिक शहरातील**

सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**विषय : नाशिक कुंभमेळ्यात सामाजिक कार्यासाठी विद्यार्थ्यांच्या सहभागाबाबत...**

**संदर्भ : पोउपआ (मु.)/सिंहस्थ कुंभमेळा २०२७/१०३/२०२५ मा. पोलीस उपआयुक्त कार्यालय नाशिक शहर यांचे दि. १९ मे, २०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

नाशिक येथे २०२६-२०२७ दरम्यान कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हे आपणांस ज्ञातच आहे. कुंभमेळा हा दर बारा वर्षानी येणारा एक राष्ट्रीय स्तरावरील भव्य धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा असून, या सोहळयास लाखो भाविक देशभरातून तसेच परदेशातूनही भेट देतात. या पार्श्वभूमीवर मा. कुलगुरू यांना नाशिक जिल्हयातील तसेच आपल्या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट यांना स्वयंसेवक म्हणून कुंभमेळ्यात सहभागी व्हावेत अशी विनंती मा. पोलिस उपआयुक्त नाशिक शहर यांनी केली आहे.

या सहभागामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेटला वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, आरोग्य सेवा, सीसीटीव्ही नियंत्रण अशा विविध कार्यक्षेत्रामध्ये इतर विविध व्यवस्थापकीय कार्यात योगदान देता येईल. कॅडेटच्या या सहभागामुळे प्रशासनाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होईल. याचबरोबरीने नागरी शिस्त, संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन आणि सामाजिक जबाबदारी या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळेल, अशा प्रकारच्या अनुभवामुळे कॅडेटचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होईल. या उद्देशाने या संबंधीचे सविस्तर पत्र आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सदर पत्र आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील संबंधीतांच्या निदर्शनास आणून जास्तीत जास्त कॅडेटला यामध्ये सहभागी होण्याकरिता महाविद्यालयांच्या प्राचार्य यांनी आपल्या महाविद्यालयातील एन.सी.सी. अधिकारी/एएनओ/सिटीओ यांना याचबरोबर संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून हा उपक्रम यशस्वी करण्याबाबत आपण संबंधित अधिकारी/कार्यालयांसोबत संपर्क साधून आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करून प्रशासनास सहकार्य करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

सहयोगी एनसीसी अधिकारी
राष्ट्रीय छात्र सेना

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावत्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 21 MAY 2025
आवक क्रमांक कोशी 2630
जावक दिनांक 21 MAY 2025

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) कार्यालय, नाशिक शहर

पत्ता: गंगापुर रोड, नाशिक Office Phone : 0253-2305205 Fax : 0253-2305219 Email ID :dcp-hq.cpnashik@gov.in

क्र:—पोउपआ (मु.)/सिंहस्थ कुंभमेळा.२०२७/103/२०२५ नाशिक शहर, दि १९/०५/२०२५

विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्र. 2211
21 MAY 2024
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रति,

मा. कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे.

**विषय :-** विद्यार्थ्यांना नाशिक कुंभमेळ्यात सामाजिक कार्यासाठी क्रेडिट देण्याबाबत..

**माननीय महोदय,**

उपरोक्त विषयांनवये, नाशिक येथे २०२६-२७ दरम्यान कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आपणास अवगत आहेच, कुंभमेळा हा दर बारा वर्षांनी येणारा एक राष्ट्रीय स्तरावरील भव्य धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा असून, या सोहळ्यास लाखो भाविक देशभरातून तसेच परदेशातूनही भेट देतात. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून, त्यांच्या अभ्यासक्रमांचा भाग म्हणून, कुंभमेळ्यात सहभागी व्हावेत असे उचित वाटते.

या सहभागामध्ये विद्यार्थ्यांना विविध कार्यक्षेत्रांमध्ये योगदान देता येईल जसे, वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, आरोग्य सेवा, सीसीटीव्ही नियंत्रण, इतर व्यवस्थापकीय कार्ये.

विद्यार्थ्यांच्या या सहभागामुळे प्रशासनाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होईल. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांना नागरी शिस्त, संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, आणि सामाजिक जबाबदारी यासारख्या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळेल. अशा प्रकारच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दिशादर्शक तत्वांनुसार, अशा प्रकारच्या सामाजिक कार्यासाठी क्रेडिट प्रणालीचा वापर करता येऊ शकतो. त्या अनुषंगाने, नाशिक कुंभमेळ्यामध्ये सामाजिक कार्यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याच्या स्वरूपानुसार क्रेडिट्स प्रदान करणे बाबत आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही व्हावी ही नम्र विनंती.

19.5.25

**( चंद्रकांत खांडवी )**
**पोलीस उपआयुक्त (मुख्या.) नाशिक शहर.**

पोलीस आयुक्त कार्यालय नाशिक शहर

Pro-VC
Dir-NSS
Dir. BSD